महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ३५० वा दिनांक : ०४/१२/२०२५ वार : गुरूवार

## सदानंद दाते राज्याचे नवे पोलिस महासंचालक होणार



**मुंबई :** वरिष्ठ पोलिस अधिकारी सदानंद दाते यांची महाराष्ट्राच्या पोलिस महासंचालकपदी निवड झाली आहे. राज्याच्या विद्यमान पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला येत्या 31 डिसेंबर रोजी आपल्या पदावरून निवृत्त होणार आहेत. त्यानंतर दाते त्यांची जागा घेतली. ते डिसेंबर 2026 पर्यंत आपल्या पदावर कायम राहतील.

यासंबंधीच्या माहितीनुसार, राज्याचे नवे पोलिस महासंचालक म्हणून सदानंद दाते यांची निवड करण्यात आली आहे. राज्याच्या गृह खात्याने या प्रकरणी 7 उच्चपदस्थ पोलिस अधिकाऱ्यांची नावे केंद्रीय लोकसेवा आयोगाकडे पाठवली होती. त्यात दाते यांचे नाव अग्रस्थानी होते. अखेर अपेक्षेनुसार त्यांच्याच नावाची राज्याचे नवे पोलिस महासंचालक म्हणून निवड झाली आहे. त्याची केवळ औपचारिक घोषणा बाकी आहे.

सदानंद दाते हे 1990 च्या आयपीएस बॅचचे अधिकारी आहेत. ते कडक शिस्तीचे व कर्तव्यनिष्ठ अधिकारी म्हणून ओळखले जातात. त्यांनी आतापर्यंत आर्थिक गुन्हे शाखा, सायबर गुन्हेगारी, रेल्वे पोलिस, नवी मुंबईचे पोलिस अधीक्षक आदी विविध पदांवर काम केले आहे.

सध्या ते एनआयएचे महासंचालक आहेत. त्यांच्या नेतृत्वात ब्लॅक कॅट कमांडोंनी विविध मोहिमा यशस्वीपणे राबवल्या आहेत. उल्लेखनीय बाब म्हणजे सदानंद दाते यांनी मुंबईवरील 26/11 च्या हल्ल्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. त्यावेळी ते मुंबई क्राईम ब्रँचमध्ये कार्यरत होते. मुंबईच्या कामा रुग्णालयात 2 अतिरेकी घुसले तेव्हा दाते यांनी मोजक्या पोलिसांच्या मदतीने त्यांचा सामना केला होता. त्यांच्या सतर्कतेमुळेच कामा रुग्णालयातून ओलिसांना सुरक्षितपणे पळून जाता आले होते. या कारवाईत दाते यांना अतिरेक्यांच्या 2 गोळ्याही लागल्या होत्या. अशा धाडसी अधिकाऱ्यावर आता संपूर्ण महाराष्ट्राच्या सुरक्षेची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

यासंबंधीच्या वृत्तानुसार, राज्य सरकारने यूपीएससीला ज्या 7 आयपीएस अधिकाऱ्यांची नावे पाठवली होती, त्यात एनआयए प्रमुख सदानंद दाते, डीजीपी (कायदा व तांत्रिक) संजय वर्मा, होमगार्ड्सचे कमांडंट जनरल रितेश कुमार, डीजीपी (लाचलुचपत प्रतिबंधक विभाग) संजीव कुमार सिंघल, महासंचालक (राज्य पोलिस गृहनिर्माण आणि कल्याण महामंडळ) अर्चना त्यागी, नागरी सुरक्षा महासंचालक संजीव कुमार आणि महासंचालक (सरकारी रेल्वे पोलिस) प्रशांत बर्डे यांचा समावेश होता. त्यात दाते यांनी बाजी मारली.

## २५ हजार मतदारांचे स्थलांतर ; प्रभाग बदलाची मनपाची कबुली




छत्रपती संभाजीनगर : महापालिका निवडणुकीसाठी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीवर आतापर्यंत 4,344 हरकती प्राप्त झाल्या. त्यापैकी 1,920 हरकतींचा निपटारा केला आहे. उर्वरित हरकतींची तपासणी सुरू आहे. मनपाचे प्राधिकृत अधिकारी आणि प्रगणक हे हरकतींची स्थळावर जाऊन पडताळणी करत आहेत. हरकतींच्या तपासणीत सुमारे 25 हजार मतदारांची नावे एका प्रभागातून दुसऱ्या प्रभागात गेल्याचे आढळले. मतदानाच्या दिवशी होणाऱ्या गोंधळापेक्षा आज झालेला गोंधळ बरा आहे. नागरिकांनी घेतलेल्या आक्षेपांवर सुधारणा करून पारदर्शक निवडणूक घेण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे मनपा आयुक्त जी. श्रीकांत यांनी मंगळवारी (2डिसेंबर) पत्रकार परिषदेत सांगितले.

आयुक्त म्हणाले, मतदार यादी शुद्ध करण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र, मोघम स्वरूपाच्या हरकतींची पडताळणी शक्य नाही. मतदार यादीत नाव वाढवणे किंवा कमी करणे हे महापालिकेच्या अधिकारात नाही. त्यामुळे अधिकाराच्या मर्यादेत राहूनच शुद्धीकरण केले जात आहे. छत्रपती संभाजीनगरात प्रभागरचनेनुसार प्रथमच निवडणूक होत असल्याने मोठ्या प्रमाणात हरकती येणे अपेक्षित होते. दुबार मतदारांची यादीही प्रसिद्ध केली आहे. ती झोन कार्यालय, निवडणूक कार्यालय आणि ऑनलाइन उपलब्ध आहे. दुबार मतदारांनी झोन कार्यालयात जाऊन आपले मतदान केंद्र लेखी स्वरूपात कळवावे लागेल.

मनपा निवडणुकीसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने तयार केलेल्या मतदार याद्यांचा वापर केला जातो.या याद्या जिल्हाधिकारी कार्यालयातून देण्यात आल्या. प्रभागांच्या सीमा निश्चित करणे, मतदार याद्यांची सीमांनुसार फोड करणे ही कामे करण्यासाठी मनपा निवडणुकांच्या कामाचा अनुभव असलेले कर्मचारी तुलनेत कमी संख्येने आहेत. त्यामुळे कमी वेळेत मतदार याद्यांची योग्य पद्धतीने फोड करण्यात कर्मचाऱ्यांना अपयश आले. परिणामी एका प्रभागातील मतदार दुसऱ्या प्रभागात गेले.

भाजपसाठी, त्यांच्या उमेदवारासाठी सोयीनुसार प्रभाग रचना करून घेतली आहे. अधिकाऱ्यांनी सत्ताधाऱ्यांच्या सांगण्यावरून हे केले असून केवळ जनतेला दाखवण्यासाठी सध्या नाटक सुरू आहे - युसुफ शेख, शहराध्यक्ष, काँग्रेस

दिव्य मराठीमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातमीत मतदार यादीतील त्रुटी निदर्शनास आणून दिल्या होत्या. त्यावर आयुक्तांनी स्पष्टीकरण दिले. आलमगीर कॉलनीतील मतदार प्रभाग क्रमांक सहामध्ये गेले होते. त्यात बदल करून त्यांना तीनमध्ये आणले आहे. रावरसपुरा ग्रामपंचायत आहे, हे खरे आहे. मात्र, त्यातील काही गट आणि माजी सैनिक कॉलनी महापालिकेच्या हद्दीत आहेत त्यामुळे ते मनपाच्या यादीत समाविष्ट आहेत. असे असले तरी त्यांची नावे जिल्हा परिषदेच्या गटातही आहेत का, याची तपासणी सुरू आहे.

दोन प्रभागांच्या सीमेवर राहणाऱ्या मतदारांना आणि उमेदवारांना मोठी अडचण निर्माण झाली आहे. यामुळे सर्वांना स्पष्टता यावी यासाठी मी आक्षेप दाखल केला आहे. यापूर्वी दाखल केलेल्या आक्षेपावर मनपाकडून बदल करण्यात आला. - विकास जैन, माजी महापौर

## डॉक्टर गौरी गर्जेला तिघांनी गळा दाबून मारले : गौरीच्या वडिलांचा गंभीर आरोप

**मुंबई :** भाजप नेत्या तथा मंत्री पंकजा मुंडे यांचे स्वीय सहाय्यक अनंत गर्जे यांच्या पत्नी डॉक्टर गौरी गर्जे पालवे यांच्या कथित आत्महत्येसंदर्भात एक नवी अपडेट आली आहे. गौरी यांची आत्महत्या नव्हे तर खून होता. त्यांना ३ जणांनी गळा दाबून ठार मारले, असा आरोप गौरी यांचे वडील अशोक पालवे यांनी बुधवारी केला. त्यांच्या या आरोपामुळे या प्रकरणाला एक वेगळी कलाटणी मिळाली आहे.

डॉक्टर गौरी गर्जे यांनी काही दिवसांपूर्वी मुंबीतील वरळी स्थित आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. या प्रकरणी पोलिसांनी त्यांचे पती अनंत गर्जे यांना अटक केली आहे. सध्या त्यांची कसून चौकशी सुरू आहे. या पार्श्वभूमीवर गौरीच्या आई-वडिलांनी आपल्या मुलीच्या मृत्यूवर शंका व्यक्त केली आहे. गौरीचे वडील अशोक पालवे यासंबंधी म्हणाले, गौरीच्या मृत्यू प्रकरणात फक्त अनंतच आरोपी नाही. त्याचे बहीण व भाऊ यांचाही यात समावेश आहे. ते ही या प्रकरणी आरोपी आहेत. पण पोलिसांनी अद्याप त्या दोघांना अटक केली नाही.

अनंत गर्जे लग्न होण्यापूर्वीपासून वरळीत राहत होता. माझ्या मुलीला तिघांनी गळा दाबून मारले. आम्ही खरे बोलत आहोत. एकतर आम्हाला न्याय द्या किंवा आम्हाला मारण्याची अथवा मरण्याची परवानगी द्या. न्यायवैद्यक पथक घरात गेल्यानंतर त्यांचे नातेवाईक त्या घरात उपस्थिति होते. त्यामुळे गौरीच्या मृत्यूला आत्महत्येचे लेबल लावू नका, असे ते म्हणाले.

यावेळी गौरीची आई अलकनंदा पालवे यांनी अनंत गर्जेला मिळालेल्या न्यायालयीन कोठडीवर संशय व्यक्त केला. आरोपी अनंतला या प्रकरणात एवढ्या लवकर न्यायालयीन कोठडी देण्याची गरज नव्हती. कारण, गौरी आत्महत्या करणारी मुलगी नव्हती. ती खंबीर तरुणी होती. आरोपीला एवढ्या लवकर का न्यायालयीन कोठडी दिली? यातील २ आरोपी अजून पकडण्यात आले नाही. ते दोघेही फरार आहेत.

पोलिस प्रकरणाचा तपास सुरू असल्याचे सांगत आहेत. पण आज १२ दिवस लोटलेत. तपासात काहीच निष्पन्न झाले नाही. सर्वजण खोटे बोलत आहेत. अनंत गर्जे गौरीला दररोज मारत होता. अनंत गर्जेची बहीण व भाऊही तिला मारहाम करत होता. त्यामुळे त्यांचीही या प्रकरणात चौकशी झाली पाहिजे, असे अलकनंदा पालवे यांनी सांगितले.

उल्लेखनीय बाब म्हणजे गौरीचे आईवडील माध्यमांशी संवाद साधताना त्यांच्यासोबत सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानियाही होत्या. पण त्या मध्येच रागाने निघून गेल्या. त्याचे झाले असे की, गौरीचे वडील तिच्या पोस्टमॉर्टेमसंबंधीची माहिती पत्रकारांना देत होते. त्यावेळी त्यांच्या पत्नीने म्हणजे गौरीच्या आईने त्यांचा हात दाबून त्यांना खुनावले. त्यावेळी गौरीच्या वडिलांनी बोलणे टाळून थेट मी काही गोष्टी सांगू शकत नाही, पण आई-वडील आल्याशिवाय पंचनामा केलाच कसा? असे म्हणाले.

त्यांची ही कृती पाहून अंजली दमानिया संतापल्या. त्या गौरीच्या आईला म्हणाल्या की, तुम्ही बोलणार नसालच तर तसे मला सांगा. मी पुन्हा यात पडणार नाही. खरंच बोलायचे असेल तर बोला. हिंमत दाखवून बोला. अंजली दमानिया यांचे हे बोल ऐकूणही गौरीची आई शांतच उभी होती. त्यामुळे दमानिया तेथून रागाने निघून गेल्या.

दुसरीकडे, पोलिसांनी या प्रकरणी अनंत गर्जे याच्या जुन्या प्रेयसीचाही जबाब नोंदवला आहे. एका मराठी वृत्तवाहिनीने ही माहिती दिली आहे. या वृत्तानुसार, एफआयआरमध्ये नाव नमूद असलेल्या अनंत गर्जे याच्या जुन्या प्रेयसीचा जबाब वरळी पोलिसांनी नोंदवला आहे. त्यात तिने २०२२ पासून आपला व अनंत याचा कोणताही संबंध नाही. विशेषतः गौरीला घरात सापडलेल्या कागदपत्रांची आपल्याला कोणतीही कल्पना नसल्याचा दावा तिने केला आहे. वरळी पोलिसांनी कोर्टात ही माहिती दिली आहे.

दरम्यान, अनंत गर्जेला काल कोर्टापुढे हजर करण्यात आले. तिथे कोर्टाने त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. पोलिस या प्रकरणी अनंतची मानसशास्त्रीय तपासणीही करणार आहेत.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०४ डिसेंबर २०२५

# जागतिक दिव्यांग दिनानिमित्त श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात दिव्यांगांचा गौरव



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** तीन डिसेंबर हा जागतिक दिव्यांग दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्त येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात दिव्यांग विद्यार्थ्यांचा व कर्मचाऱ्यांचा सन्मान प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांच्या हस्ते करण्यात आला. दिव्यांगांना सर्वांच्या बरोबरीचा दर्जा मिळावा, दिव्यांग मध्ये अधिकाऱ्यांबाबत जागृती व्हावी, दिव्यांगांबाबत शासकीय योजनांची माहिती व्हावी या उद्देशाने जागतिक दिव्यांग दिन साजरा केला जातो. त्यानिमित्त महाविद्यालयात प्रतिनिधीक स्वरूपात दिव्यांग विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमात स्पर्धा परीक्षाची तयारी करणारे सायली बिराजदार (बी.ए. द्वितीय वर्ष), अक्षय विजयापुरे (बी.ए. द्वितीय वर्ष), तर नीट परीक्षेची तयारी करणारी राजश्री भोसले (इयत्ता बारावी) या विद्यार्थ्यांबरोबरच महाविद्यालयातील आदर्श कर्मचारी पुरस्कार प्राप्त ग्रंथालय परिचर भगवान औरादे यांचा पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला.यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. संजय असेल म्हणाले की, दिव्यांग व्यक्ती समाजासाठी प्रेरणादायी आहेत. त्यांच्या जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाचे यावेळी त्यांनी कौतुक केले. या सन्मानामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांचे मनोबल अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले, उपप्राचार्य गुंडाजी मोरे, पर्यवेक्षक शैलेश महामुनी, डॉ. ज्ञानोबा ढोबळे, डॉ. भरत शेळके, प्रा. मुरली जाधव तसेच रजिस्टर राजकुमार सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. डी. बी. ढोबळे यांनी केले तर डॉ. भरत शेळके यांनी आभार मानले.




## उन्हाच्या नोंदी..

झाली वजाबाकी साऱ्या बेरजेची
हाती भोपळ्याची वेल आली
इतभर पोट तरी किती घोर
गळ्यात रे दोर बांधलेला

उन्हाच्या कटात सावलीचा भाग
कोणावर राग काढू आता

मातीच्या पाटीत घामाच्या शाईत
स्वप्नांच गणित भिजलेलं

शून्य मागे पुढे धावतोय रोज
रडवेला आज जीव झाला

उन्हाच्या या नोंदी उन्हात तळल्या
तळून उरल्या गणितात



**ज्ञानेश्वर गायके**
कन्नड
मो.९४०३३८४८८९

## मेणबत्ती

मेणबत्ती ग मेणबत्ती
किती ग तू गुणी
तुझ्यासारखे उपकार
करत नाही कुणी

स्वत: सतत जळून
प्रकाश देतेस आम्हा
स्वत:ची मात्र
कधीच नसते तमा

परोपकाराच्या भावनेनं
बजावतेस आपले कर्म
दुसऱ्यासाठी जगत रहा
तुझा खरा धर्म

ना तुला अहंकार
ना तुला स्वार्थ
तुझ्याकडून शिकूया
जगण्याचा अर्थ



• **रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

**महाराष्ट्र जनशक्ती**

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०४ डिसेंबर २०२५

# डॉ. सुधीर देवरे यांची 'जीवदान' कादंबरी प्रकाशित



**सटाणा (नाशिक)** येथील ज्येष्ठ साहित्यिक, भाषातज्ज्ञ, समीक्षक, संशोधक व भाषा, कला, लोकजीवन, लोकसंस्कृती यांचे अभ्यासक डॉ. सुधीर रा. देवरे यांची 'जीवदान' कादंबरी पुण्याच्या राजहंस प्रकाशनातर्फे नुकतीच प्रकाशित झाली. या पुस्तकासह डॉ. सुधीर देवरे यांची आतापर्यंत बत्तीस पुस्तके प्रकाशित झाली आहेत. बापाने आईचा खून केला म्हणून पौगंडावस्थेतल्या मुलाने बापाचा खून केला. त्यामुळे इतक्या कमी वयातल्या मुलाला काय काय सोसावे लागले? भावनिक आंदोलने आणि मनोव्यापार यांची धक्कादायक कथा साकारणारी शोकांतिका म्हणजे 'जीवदान' ही कादंबरी. कादंबरीत मोठ्या प्रमाणात अहिराणी बोली उपयोजित झाली असून ग्रामीण साहित्यातील वेगळाच कलात्मक मापदंड या कादंबरीने गाठला आहे. 'डंख व्यालेलं अवकाश', 'आदिम तालनं संगीत', 'कला आणि संस्कृती: एक समन्वय', 'पंख गळून गेले तरी', 'अहिराणी लोकपरंपरा', 'अहिराणी गोत', 'अहिराणी वट्टा', अहिराणी लोकसंस्कृती', 'अहिराणीच्या निमित्ताने: भाषा', 'अहिराणी : भाषा, परंपरा आणि संस्कृती', 'भाषा : व्याप्ती आणि गंड', 'मी गोष्टीत मावत नाही', 'सोन्याची शाळा', 'गावदवंडी', 'डोंगरदेव', 'माणूस जेव्हा देव होतो', 'सहज उडत राहिलो', 'साहित्य : जाणिवा, मीमांसा आणि समीक्षा', 'आस्वाद: भावलेल्या कवितांचा', 'माणसं मरायची रांग', 'ब्लॉगच्या जाळ्यातून जग', 'सायकोचा तिढा' आदी डॉ. सुधीर देवरे यांची या आधीची ग्रंथसंपदा आहे.

# "मर्मगंध" कवितासंग्रहाचे आ. विक्रम काळे यांच्या हस्ते प्रकाशन



**छत्रपती संभाजीनगर :- (प्रतिनिधी)** आज दिनांक ३ डिसेंबर सकाळी ११ वाजता जागतिक दिव्यांग दिनाच्या निमित्ताने मराठवाडा विभागाचे शिक्षक आमदार मा. विक्रमजी काळेसाहेब यांच्या हस्ते पैठण तालुक्यातील साहित्यिक अय्युब पठाण लोहगावकर लिखित "मर्मगंध" या प्रौढकवितासंग्रहाचे प्रकाशन हडको येथील गोदावरी विद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे नुकतेच थाटात पार पडले. या प्रसंगी शिक्षक आमदार यांनी सांगितले की," अय्युब पठाण लोहगावकर हे खडतर जीवन जगलेले असून त्यांचा बॅन्डमास्टर ते शाळामास्टर असा .जीवन- प्रवास आहे. गेल्या चाळीस वर्षापासून ते मराठी साहित्य क्षेत्रात लेखन करून समाजाची व्यथा-वेदना साहित्यात मांडले असून तसेच बालकांसाठीही मनोरंजनात्मक पुस्तकांचेही ते लेखन करीत आहे. "मर्मगंध" हा त्यांचा पंधरावा कवितासंग्रह आहे. या प्रकाशन सोहळ्या प्रसंगी छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा अध्यक्ष राष्ट्रवादी शिक्षक संघाचे (माधामिक ) विभागाचे प्रदीप विखे आणि ( प्राथमिक ) विभागाचे कवी मनोज खुटे यांची प्रमुख पाहुणे म्हणून विशेष उपस्थिती होती. तसेच याप्रसंगी वाहेद शेख, गोविंद गायकवाड, तसेच बिडकीन येथील आबरार पठाण, मुदस्सर पठाण, खालेद चाऊस हे प्रकाशन कार्यक्रमाला उपस्थित होते.

# ७ डिसेंबर रोजी छत्रपती संभाजीनगरमध्ये संविधान जनजागरण परिषदेचे आयोजन






















**छत्रपती संभाजीनगर :** 'आम्ही भारताचे लोक'च्या वतीने भारतीय संविधान दिन, संविधान अंमलबजावणी दिन यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त दि. ७ डिसेंबर २०२५ रोजी संविधान जनजागरण परिषदेचे आयोजन यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, मसाप, रॉक्सी सिनेमाजवळ, पैठण गेट, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे दुपारी १२:३० वाजता होणार आहे. या परिषदेचे उद्घाटक सर्वोच्च न्यायालयाचे ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. महमूद प्राचा (नवी दिल्ली) हे करणार आहेत. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ माजी जिल्हा न्यायाधीश ॲड. प्रकाश परांजपे (छत्रपती संभाजीनगर) हे राहणार आहेत. या परिषदेमध्ये प्रमुख वक्ते ज्येष्ठ निर्भीड पत्रकार निरंजन टकले (नाशिक) नागपूर येथील उच्च न्यायालयाचे खंडपीठाच्या विधिज्ञ ॲड. स्मिता कांबळे हे राहणार आहेत. या परिषदेचे स्वागताध्यक्ष सार्वजनिक बांधकाम विभागाचे माजी कार्यकारी अभियंता इंजि. अशोक येरेकर हे आहेत. या परिषदेला उपस्थिती म्हणून ॲड. के.ई. हरिदास, न्या. डी.आर. शेळके, कॉ. किशोर ढमाले, ॲड. धनंजय बोरडे, डॉ. मच्छिंद्र गोर्डे, डॉ. ऋषीकेश कांबळे, साथी सुभाष लोमटे, डॉ. वासुदेव मुलाटे, कॉ. भीमराव बनसोड, प्रा. राम बाहेती, सुभाष महेर, प्रा. एच.एम. देसरडा, सुभेदार मेजर सुखदेव बन, ॲड. एस.आर. बोदडे, डॉ. शेख इक्बाल मिन्ने, ॲड. वैशाली डोळस, सतिश चकोर, डॉ. प्रमोद दुथडे, इंजि. चंदशेखर शिखरे, इंजि. महेश निनाळे, डॉ. एन.जी. नरवडे, ॲड. सुभाष सावंगीकर, बी.के. आदमाने, ॲड. डी.व्ही. खिल्लारे, या संविधान जनजागरण परिषदेला सर्व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मुख्य संयोजक संविधान विश्लेषक अनंत भवरे आणि प्रा. भारत सिरसाट यांनी केले आहे.

या परिषदेच्या यशस्वीतेसाठी रतनकुमार साळवे, कॉ. अभय टाकसाळ, डॉ. जनार्दन पिंपळे, डॉ. फारूक खान, अतकरे बापू, सविता अभ्यंकर, अरविंद खैरनार, रविंद्र तायडे, कॉ. मधुकर खिल्लारे, वसुधा कल्याणकर, दैवशाला गवंदे, डॉ. समाधान इंगळे, सुनिता शिंदे, इंद्रकुमार जेवरीकर, जितेंद्र भवरे, वजिर शेख,

खालीद अहेमद, डॉ. धोंडोपंत मानवतकर, सुधाकर निसर्ग, भाऊ पठाडे, डॉ. अरूण कांबळे, ग.ह. राठोड, राजानंद सुरडकर, अन्वर शेख, बापुराव कांबळे, सतिश काळे, लिला ठोके, मधुकर गवंदे, शेख पाशुभाई, नौशाद उस्मान, डॉ. उमाकांत राठोड, रंजन दाणी, रवी वासाटे, नामदेव जिंदे, रमेश तेले, डॉ. बालाजी गिमेकार, विजय बहादुरे, ॲड. जयश्री भगत, पूनम पाटील, रामचंद्र वानखेडे आदी परिश्रम घेत आहेत.

# पालक सभा व डिजिटल क्लास रुमचे उदघाटन



**छत्रपती संभाजतीनगर :** दिनांक 2/12/2025 ,वार- मंगळवार रोजी मनपा प्रा.शा. विश्रांतीनगर शाळेत "पालक सभा व डिजिटल क्लास रुमचे उदघाटन "कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास केंद्रीय मुख्याध्यापक श्री.चौधरीसर, श्री फड सर, श्री. पालवे सर श्री. ॲड. ताराचंद गायकवाड, श्रीम. उषाताई धनवई तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री. आवारेसर उपस्थित होते. सूत्रसंचालन श्रीम. पवार मॅडम यांनी केले, आभार श्रीम.देशमुख मॅडम यांनी मानले. कार्यक्रमास पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# वन्यजीव संरक्षण : मानवतेच्या अस्तित्वाचा मूलाधार

**मा**नवी संस्कृतीचा इतिहास पाहिला तर मानवाने निसर्गासोबत सहजीवनाचे नाते निर्माण केले होते. प्राचीन काळात वन, नदी, पर्वत आणि वन्यजीव हे फक्त संसाधने नव्हते, तर सांस्कृतिक, धार्मिक आणि आध्यात्मिक जीवनाचा केंद्रबिंदू होते. मात्र, औद्योगिकीकरण, नागरीकरण, भौतिकवाद आणि विकासाच्या स्पर्धेने मानवाने निसर्गापासून स्वतःला वेगळे केले आणि परिणामस्वरूप पृथ्वीवरील जीवसृष्टी आज अभूतपूर्व संकटात आहे. ०४ डिसेंबर रोजी साजरा केला जाणारा 'वन्यजीव संरक्षण दिन' हा केवळ स्मरणाचा दिवस नाही, तर पर्यावरणीय संतुलनाच्या संरक्षणाचा आणि मानवी जबाबदारीची पुनर्स्थापना करण्याचा सामाजिक संदेश देणारा दिवस आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर वन्यजीव संरक्षण हा पर्यावरणीय न्याय, सामाजिक नीती, टिकाऊ विकास आणि सांस्कृतिक वारसा जपण्याचा व्यापक प्रश्न आहे.वन्यजीव हे केवळ जंगलातील प्राणी नसून पर्यावरणीय व्यवस्था आणि जीवनाच्या शृंखलेतील महत्त्वाचा दुवा आहेत. जैवविविधता ही निसर्गाची संपत्ती असून त्याचा नाश म्हणजे पृथ्वीवरील पर्यावरणीय संतुलनाचा नाश. समाजशास्त्रात 'इको-फेमिनिझम', 'एन्व्हायर्नमेंटल सोशिअलिझम' आणि 'ह्युमन-नेचर रिलेशन' सारख्या संकल्पनांद्वारे किंवा सिद्धांतांद्वारे मानव आणि निसर्गातील असमान सत्ता-संबंधांचा अभ्यास केला जातो. पर्यावरणवादी विचारवंतांच्या मते मानवाने स्वतःला निसर्गाचा स्वामी नव्हे तर त्याचा घटक मानले असते, तर आजची परिस्थिती वेगळी असती. आज जगभरात १० हजारांहून अधिक प्रजाती नामशेष होण्याच्या उंबरठ्यावर आहेत, आणि अनेक प्राणी केवळ इतिहासातील नोंदीत उरले आहेत. वाघ, गेंडा, चित्ता, हिमचित्ता, समुद्री कासव, गिधाडे, डॉल्फिन, तसेच हजारो पक्षी, कीटक आणि सरीसृपांच्या प्रजाती मानवी अतिक्रमणामुळे धोक्यात आहेत.वन्यजीव संरक्षण हा केवळ पर्यावरणाचा मुद्दा नाही तर सामाजिक प्रश्न आहे. जंगलातील प्राण्यांचे अस्तित्व जंगलावर आणि जंगलाचे अस्तित्व स्थानिक आदिवासी आणि वनसमुदायांवर अवलंबून आहे. आदिवासी समाजाचा जीवनमार्ग हा वनसंस्कृतीशी एकरूप आहे. त्यांच्या लोककथा, नृत्य, पुराणकथा आणि श्रद्धांमध्ये वन्यजीवांचे स्थान अत्यंत पवित्र आहे. पण विकासाच्या नावाखाली जंगलतोड, खाणकाम, धरणे, रेल्वे प्रकल्प आणि नागरी विस्तारामुळे हे समुदाय विस्थापित होत आहेत, त्यांचे जंगलावरचे हक्क कमी होत आहेत आणि मानव-वन्यजीव संघर्ष वाढत आहे. चित्ता, बिबट्या किंवा हत्ती शेतात घुसतो तेव्हा तो दुष्ट प्राणी नसतो; तो त्याच्या नैसर्गिक अधिवासातून हुसकावला गेलेला जीव असतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर हा संघर्ष विकास मॉडेलच्या त्रुटींचे प्रतीक आहे, ज्यात निसर्गापेक्षा भौतिक प्रगतीला महत्त्व दिले गेले.वन्यजीवांचे अस्तित्व पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. उदा. गिधाडांचे प्रमाण घटल्यामुळे भारतात मृत प्राण्यांचे विघटन थांबले, ज्यामुळे संक्रमणांचे प्रमाण वाढले. वाघ, सिंह, बिबट्या यांसारख्या शिकारी प्राणी जीवसाखळीत संतुलन राखतात. मधमाश्या आणि पक्षी परागीकरण करून शेतीची उपज वाढवतात. डॉल्फिन, मगर आणि सागरी जीव हा जलस्रोत आणि सागरी परिसंस्थेच्या आरोग्याचे संकेतक आहेत. म्हणूनच समाजात 'मानवकेंद्रित विकास' ऐवजी 'परिसंस्थाकेंद्रित विकास' हा दृष्टिकोन स्वीकारणे गरजेचे आहे.शिक्षण आणि जागरुकता ही संरक्षणातील महत्त्वाची पायाभूत साधने आहेत. आजची मुले मोबाईल गेम्स आणि आभासी जगात रममाण आहेत, पण जंगलातील पक्ष्यांचा आवाज किंवा नदीचा प्रवाह ऐकण्याची त्यांना संधी मिळत नाही. स्थानिक पर्यावरणावर आधारित शिक्षण, वन्यजीवांच्या क्षेत्रभेटी, आणि नैसर्गिक संसाधनांविषयी संवेदनशीलता निर्माण करणारे अभ्यासक्रम यामुळे पुढील पिढी पर्यावरणाबद्दल जागरूक होईल. सोशल मीडिया देखील माहितीचा प्रभावी दुवा आहे, पण त्याचवेळी 'भय', 'अंधश्रद्धा', 'विनाशकारी विचारसरणी' आणि फक्त मनोरंजन म्हणून वन्यजीव पाहण्याची मानसिकता बदलणे महत्त्वाचे आहे.कायद्यांच्या दृष्टिकोनातून भारतात १९७२ चा वन्यजीव संरक्षण कायदा, राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये आणि प्रोजेक्ट टायगर, प्रोजेक्ट एलिफंट यांसारखे उपक्रम राबविण्यात येतात. परंतु कायदे पुरेसे नसतात, जर मानसिकता बदलली नाही तर. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता, संरक्षण ही सामूहिक जबाबदारी आहे. सरकार, स्वयंसेवी संस्था, स्थानिक समुदाय, संशोधक, पर्यावरणवादी, मीडिया आणि सामान्य नागरिक यांचे एकत्रित प्रयत्न आवश्यक आहेत. वन्यजीव केवळ 'जंगलातील वस्तू' नाहीत, ते पृथ्वीच्या परिसंस्थेचे सजीव नागरिक आहेत आणि त्यांना जगण्याचा अधिकार तितकाच आहे जितका मानवाला.आज आपण अशा वळणावर उभे आहोत जिथे वन्यजीव संरक्षण हा निवडीचा प्रश्न राहिलेला नाही; तो अस्तित्वाचा प्रश्न आहे. जंगल नसेल तर पाणी नाही, पाणी नसेल तर शेती नाही, आणि शेती नसेल तर मानवाचे जीवनच नाही. म्हणूनच 04 डिसेंबर हा दिवस केवळ उपक्रम किंवा घोषणांचा दिवस नसून आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आपण भविष्याला काय देत आहोत, जीवसृष्टीने परिपूर्ण हिरवी पृथ्वी की निर्जीव वाळवंट?शेवटी एवढेच वन्यजीवांचे संरक्षण म्हणजे जंगल वाचवणे आणि जंगल वाचवणे म्हणजे पृथ्वीला जिवंत ठेवणे. म्हणून आपल्या जीवनशैलीत बदल करा, निसर्गाशी नाते पुन्हा जोडून घ्या, आणि प्रत्येक जीवप्रकाराला त्याच्या अस्तित्वाचा अधिकार देणारा समाज निर्माण करा. कारण आपण विसरू नये की मानव पृथ्वीचा मालक नाही, तर फक्त तात्पुरता पाहुणा आहे, आणि वन्यजीव हे तिचे खरे वारसदार आहेत.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. ९९६०१०३५८२
bagate.rajendra5@gmail.com

## कालिकादेवी विद्यालयात,'मा. जयदत्त (अण्णा) क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन



**शिरूर कासार :** कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर (का.)जि.बीड येथे जिल्ह्याचे लोकप्रिय नेते तथा माजी मंत्री मा. जयदत्त (अण्णा) क्षीरसागर साहेब यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त विद्यालयात,"प्रश्नमंजुषा स्पर्धा, निबंध स्पर्धा, सामान्यज्ञान स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, आणि हस्ताक्षर स्पर्धा "अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. दि.०२/१२/२०२५ मंगळवार रोजी, विद्यालयाचे मुख्याद्यापक तथा प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या हस्ते 'स्व.काकू व नानां' यांच्या प्रतिमांचे पुजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य केशव भांगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, "लोकनेते मा.जयदत्त अण्णासाहेबांचे सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, आणि सहकार क्षेत्रातील योगदान आपल्याला विसरता येणार नाही.त्यांनी केलेल्या कार्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्वच समाजातील हुशार,गरिब होतकरू,गरजवंतांना आणि बेरोजगारांना नोकरी,रोजगार उपलब्ध झाला आहे. मा. अण्णांसाहेबांच्या वाढदिवसा-निमित्त होत असलेल्या या स्पर्धांमुळे,विद्यार्थ्यांना विविध विषयाचं ज्ञान आकलन व्हावं.त्यांच्या सामान्यज्ञानात भर पडावी,आणि त्यांच्या उपजत गुणांना व्यक्त होण्यासाठी विचारपीठ मिळावे' या उद्देशाने प्रस्तुत स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.असा मनोदय त्यांनी व्यक्त केला. त्यांतर "प्रश्नमंजुषा स्पर्धा" घेण्यात आली.ही स्पर्धा दोन गटात घेण्यात आली.लहान गटात, इ.५ वी ते ७ वी वर्गातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे विजेतेपद इ.७ वी तील कु.गायत्री गायके कु.तन्वी भोसले चि.अतुल इंगळे चि.प्रथमेश वारे या विद्यार्थ्यांनी पटकावले.तर मोठ्या गटात इ.८ वी ते १० वी.वर्गातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये इ.८ वी वर्गातील कु.श्रावणी आघाव,कु.पद्मजा विघ्ने,चि.आशय बडे,चि.ध्रुव मंगरूळकर या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. स्पर्धेत जिंकलेल्या विद्यार्थ्यांचं अभिनंदन करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने, पर्यवेक्षक जनार्दन काळे, विज्ञान प्रमुख प्रा.संजय काकडे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. आत्माराम झिंजुर्डे, परीक्षा प्रमुख प्रा. नामदेव तरकसे, स्पर्धा प्रमुख सौ.अनिता लाटे, प्रशांत राऊत, बाळासाहेब येवले, निवेदक जयेंद्र निकम, परीक्षक आप्पासाहेब कांबळे, नितीन बहिर तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक, क. प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए
मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०४ डिसेंबर २०२५


## शंभर रुपयाच्या बॉण्डवर शपथपत्रासहित जलसंपदाचे सचिव दीपक कपूरची शासनाकडे तक्रार

**छत्रपती संभाजीनगर :** मुंबई शासनाच्या स्वच्छ गतिशील कारभाराचे शासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिंडवडे काढले आहे शासनाकडे प्रशासनातील गैरव्यवहार भ्रष्टाचार लाचखोरीच्या शेकडो तक्रारी धुळखात पडून असल्याचे एका जलसंपदा प्रकरणावरून उघड झाले आहे सामाजिक कार्यकर्ते रऊफ पटेल यांनी छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यात जलसंपदा खात्यात झालेल्या कोट्यावधी रुपयांच्या भ्रष्टाचाराच्या तक्रारी जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांच्या कार्यालयाकडे पुराव्यानिशी केल्या आहे मात्र संबंधित भ्रष्ट अधिकाऱ्यांना शह देण्यासाठी अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर हे जाणीवपूर्वक तक्रारींकडे दुर्लक्ष करीत असल्याचे रऊफ पटेल यांनी शंभर रुपयांच्या बॉण्डबर शपथपत्रासहित मुख्य सचिव यांच्या कार्यालयाकडे तक्रार केली आहे सदर तक्रारीत त्यांनी अनेक गंभीर मुद्दे उपस्थित केले आहे त्यामध्ये पैठणतालुक्यातील ब्राह्मणगाव उपसा सिंचन योजनेचे काम करणारे कंत्राटदार अंबरवाडी कर यांच्यावर 2017 पासून लावलेला दररोज 25 हजार रुपयाचा दंड वसूल करावा अंबरवाडी कर कंत्राटदाराला नियम बाह्य दिलेले कोट्यावधी रुपयांची बिले वसूल करावे अंबरवाडी कर कंत्राटदाराला दिलेल्या कामांच्या निविदा प्रक्रियेत फेरफार झाला असून त्याची चौकशी करावी शासन नियुक्त तबार समितीचा चौकशीअहवाल 2021 पासून नो स्वीकारणे सिल्लोड तालुक्यातील पूर्णा नदीवरील दहा बरेज कामांमध्ये शासन नियमांची पाय मल्ली करणे सिल्लोड येथील जलसंपदा विभागाची जमीन नगर परिषदेला विनामूल्य परस्पर देणे तसेच शासकीय विश्रामगृहाची कागदपत्री देखभाल दुरुस्ती करणे सिंचन व्यवस्थापन कायदा 2005 ची अंमलबजावणी न करता पाणी वापर संस्थांसाठी बेकायदा निविदा काढणे कार्यकारी अभियंता अनिल निंभोरे यांची अनेक प्रकरणे न्यायप्रविष्ठ असताना त्यांना सेवानिवृत्तीच्या लाभासाठी नादेय ना बाकी ना चौकशी प्रमाणपत्र देणे कागदोपत्री वृक्षारोपण झाले असतानाही कागदपत्री कामे करणाऱ्या अधीक्षक अभियंता चंद्रशेखर पाटोळे यांची चौकशी न करणे मुख्य अभियंता विजय घोगरे यांच्या भ्रष्टाचाराच्या तक्रारी दडवून ठेवणे अशा अनेक मुद्धानिहाय पुराव्यानिशी जलसंपदा खात्याच्या अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांच्या कार्यालयाकडे तक्रारी केली केल्या आहे.मात्र संबंधित सचिवांनी या प्रकरणी कोणतीही कार्यवाही केली नाही शासनाच्या या दि रंगाही कारभाराला कंटाळून सामाजिक कार्यकर्ते रऊफ पटेल यांनी आता मुख्य सचिव यांच्या कार्यालयाकडे शंभर रुपयाच्या बॉण्ड पेपरवर शपथपत्रासहित तक्रार केली आहे आता या तक्रारीला मुख्य सचिव न्याय देतील का? हे पाहावे लागेल.



महाराष्ट्राच्या जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांनी तक्रारीत नमूद प्रकरणी संघटित भ्रष्टाचार करणाऱ्या अधिका-यांना पाठीशी घालण्यासाठी संचिका प्रलंबित ठेवल्या आहेत. वारंवार पाठपुरावा करुन देखील न्याय हक्क मिळत नाही म्हणून शपथपआवर तक्रार केली आहे. भविष्यात सक्षम न्याय प्राधिकरणाकडे दाद मागणार आहे.

**रऊफ एन. पटेल**






## 'एमपीएससी' ने ४२ दिवसांच्या विलंबाने २.५ हजारांवर परीक्षार्थी ठरवले "एजबार"




**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने गट ब मधील विविध पदांसाठी पूर्व परीक्षेचे वेळापत्रक निश्चित केलेले असते,परंतु मागील वेळापत्रक जे डिसेंबर-जानेवारीत येणे अपेक्षित होते,ते जुलै २०२५ मध्ये जाहिरात येऊन ऑगस्टमध्ये अर्ज प्रक्रिया झाली. अर्ज भरल्यापासून ते परीक्षेपर्यंतचे वय पात्रतेसाठी गृहित धरले जाते. त्यानुसार सुरुवातीला ही परीक्षा ९ नोव्हेंबरला होणार होती. मात्र नंतर बदल करत २१ डिसेंबरची तारीख दिली.

परंतु,वयोमर्यादेत शिथिलता दिली नाही.यामुळे विलंबातील ४२ दिवसांच्या फरकाने पीएसआय पदासाठीचे परीक्षार्थी एजबार झाल्याने परीक्षेला बसू शकणार नाही. यामुळे राज्यभरातील अडीच ते तीन हजार उमेदवारांचा अपेक्षा भंग झाला आहे.

सहायक कक्ष अधिकारी : ३ पदे राज्य कर निरीक्षक २७९ : पदे दुय्यम निबंधक : पदे निश्चित नाहीत पोलिस उपनिरीक्षक : ३९२ पदे. यासर्व पदांसाठी राज्यातून २.५० लाख परीक्षार्थी आहेत. तसेच छत्रपती संभाजीनगरमधून ६४ केंद्रांवर २०,१८४ जण परीक्षा देणार आहेत.

मागील डिसेंबर अथवा जानेवारी मध्येचजाहिरात येणे अपेक्षित होते, परंतु प्रशासनाच्या दिरंगाईमुळे ही प्रक्रिया उशिरा झाली. फक्त आठ ते दहा दिवसांमुळे काही उमेदवार "एजबार' झालेत. त्यात माझा भाऊही आहे. उमेदवारांना संधी द्यावी.- सारिका पाटील, परीक्षार्थी.

नोव्हेंबरमध्ये होणारी परीक्षा डिसेंबरमध्ये होते आहे. त्याच दिवशी निवडणुकीचा निकालही आहे. त्यामुळे पुन्हा बदल होतो की काय, अशी भीती वाटते. तर पीएसआयपदासाठी अनेक जणांची वयोमर्यादा आता ओलांडली आहे. विलंब झाला त्यात उमेदवारांचा काय दोष, त्याचा विचार व्हावा.-महेश घरबुडे, अध्यक्ष, स्पर्धा विद्यार्थी

आयोगाकडून वेळापत्रक आणि जाहिरात करताना विलंब झाला. तेव्हा परीक्षेच्या सायकलनुसार त्यांनी वयोमर्यादेत शिथिलता देणे अपेक्षित होते, परंतु तो निर्णय संपूर्णत: शासनावर आहे. याचा फटका विद्यार्थ्यांना बसला आहे. मात्र विद्यार्थ्यांनी संबंधित मागणी अर्ज करतानाच करायला हवी होती. दिलीप खाटेकर,स्पर्धा परीक्षा तज्ज्ञ.

९ नोव्हेंबर रोजी होणारी ही संयुक्त पूर्वगट "ब' (अराजपत्रित) परीक्षा पावसामुळे पुढे ढकलली . ती २१ डिसेंबर रोजी होणार आहे, परंतु याच दिवशी नगर परिषद निवडणुकीचा निकाल आहे. त्यामुळे पुन्हा ही परीक्षा ठरलेल्या वेळेत होईल की तारीख बदलेल, याची स्पष्टता न झाल्याने परीक्षार्थींत संभ्रम कायम आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002